# जिल्हा परिषद रत्नागिरी

## सामान्य प्रशासन विभाग

## जाहिर प्रकटन

जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती-२०२३ अन्वयें जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत पशुधन पर्यवेक्षक, वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) व कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) या तीन संवर्गांतील घोषित केलेल्या रिक्त पदांकरीता घेणेत आलेल्या ऑनलाईन परीक्षेअंती गुणवत्ता यादी व गुणवत्ता यादीनुसार सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून तात्पुरती निवड यादी रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या https://www.zpratnagiri.org/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

प्रसिध्द करणेत आलेल्या जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत **पशुधन पर्यवेक्षक** या संवर्गातील घोषित रिक्त पदांकरीताचे तात्पुरती निवड यादीतील उमेदवारांचे मूळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व दस्तऐवज तपासणी करीता **शुक्रवार दिनांक ०१/०३/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता** जिल्हा परिषद रत्नागिरी येथे आयोजन करणेत आलेले आहे.

तसेच **वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) व कनिष्ठ सहाय्यक (लिपिक)** या दोन संवर्गातील घोषित रिक्त पदांकरीताचे तात्पुरती निवड यादीतील उमेदवारांचे मूळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व दस्तऐवज तपासणी करीता **मंगळवार दिनांक ०५/०३/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता** जिल्हा परिषद रत्नागिरी येथे आयोजन करणेत आलेले आहे.

मूळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व मूळ दस्तऐवज सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी सोबत जोडणेत आली आहे. त्यानुसार **पशुधन पर्यवेक्षक** पदाकरीताचे तात्पुरती निवड यादीतील उमेदवारांनी नमूद मूळ आवश्यक कागदपत्रे/दस्तऐवज व त्यांची २ स्वसाक्षांकित प्रतीसह **शुक्रवार दिनांक ०१/०३/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता** "श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह", भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, जिल्हा परिषद रत्नागिरी (तिसरा मजला), माळनाका, रत्नागिरी येथे न चुकता उपस्थित रहावे. तसेच **वरिष्ठ सहाय्यक (लिपिक) व कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) पदाकरीताचे** तात्पुरती निवड यादीतील उमेदवारांनी नमूद मूळ आवश्यक कागदपत्रे/दस्तऐवज व त्यांची २ स्वसाक्षांकित प्रतीसह **मंगळवार दिनांक ०५/०३/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता** "श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह", भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, जिल्हा परिषद रत्नागिरी (तिसरा मजला), माळनाका, रत्नागिरी येथे न चुकता उपस्थित रहावे.

तात्पुरत्या निवड यादीमध्ये समावेश असणाऱ्या व कागदपत्र पडताळणीकरीता पाचारण करणेत आलेल्या उमेदवारास अंतिम निवडीचा कोणताही दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तसेच विहित दिनांकांना कागदपत्रे/दस्तऐवज पडताळणी करीता गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांना निवड प्रक्रिये संबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही याची नोंद घ्यावी. कागदपत्र पडताळणीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

कागदपत्र पडताळणी अंती अंतिम निवड यादी मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समितीचे मान्यतेनंतर रत्नागिरी जिल्हा परिषदेचे संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करणेत येईल.

दिनांक :- २३/०२/२०२४
स्थळ :- रत्नागिरी

(किर्ती किरण पुजार, भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद रत्नागिरी.

# जिल्हा परिषद रत्नागिरी सरळसेवा पदभरती २०२३

## या जिल्हा परिषदेद्वारे प्रसिध्द करणेत आलेल्या विविध पदांकरीता उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीस घेवून यावयाचे कागदपत्रांची यादी.

| अ.क्र. | कागदपत्रे/प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या मूळ अर्जाची प्रिंट आऊट तसेच परीक्षा फी जमा केल्याचा पुरावा. |
| २ | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे साध्या कागदावरील स्वयंघोषणापत्र. |
| ३ | एस.एस.सी., एच.एस.सी., पदवी, पदव्युत्तर शिक्षण तसेच त्या त्या पदासाठी विहित केलेनुसार शैक्षणिक अर्हतेचा पुरावा. |
| ४ | जन्मदिनांक पुरावा. (जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, माध्यमिक (एस.एस.सी.) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र) |
| ५ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा. (लागू असल्यास) |
| ६ | सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय असल्याबाबतचा (जात प्रमाणपत्र) पुरावा. (लागू असल्यास) |
| ७ | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, जातपडताळणी प्रमाणपत्र. (लागू असल्यास) |
| ८ | अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र. (लागू असल्यास) |
| ९ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा. (लागू असल्यास) |
| १० | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा. (लागू असल्यास) |
| ११ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा. (लागू असल्यास) |
| १२ | प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा. (लागू असल्यास) |
| १३ | अनाथ आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा. (लागू असल्यास) |
| १४ | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र. |
| १५ | महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांमधील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला. (लागू असल्यास) |
| १६ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा. |
| १७ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन. |
| १८ | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र. (लागू असल्यास) |
| १९ | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र. (लागू असल्यास) |
| २० | टंकलेखन प्रमाणपत्र. (लागू असल्यास) |
| २१ | लघुलेखन प्रमाणपत्र. (लागू असल्यास) |
| २२ | अनुभव प्रमाणपत्र. (लागू असल्यास) |
| २३ | नावातील बदलाबाबत प्रमाणपत्र/शासन राजपत्र (लागू असल्यास) त्याबाबतचा पुरावा. |
| २४ | छायाचित्र ओळख पुरावा (आधारकार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड, राज्य निवडणूक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, पारपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे बँकेकडून सत्यापित केलेल्या छायाचित्रासहीतचे खातेपुस्तक) |
| २५ | मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल त्याबाबतचे कागदपत्र. (लागू असल्यास) |